जनेप प्राधिकरण JNPA | INDIA'S LARGEST CONTAINER PORT

# JNPA Updates on Container Movement Status; Number of CFS Bound Containers Reduced

**Mumbai, May 24th, 2026:** Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) - India's Largest Container Port, on Thursday stated that the number of CFS-bound containers stranded for more than 15 days has reduced from around 2,500 to 450 due to the measures undertaken. The figure is expected to come down to a negligible level within the next week. The situation was caused due to the acute shortage of drivers within the port logistics ecosystem.

As of today, the average import discharge per day stands at 12,237 TEUs, while the Import – CFS Pendency in TEUs currently stands at 40,809 TEUs. Gate movement recorded a total of 17,425 TEUs, comprising 7,950 TEUs inbound movement and 9,475 TEUs outbound movement. Also, the green channel movement has been initiated for Ameya CFS from NSICT and NSIGT. NASCOWA deployed 70–80 TTs to facilitate the movement.

Kerry Indev CFS has successfully evacuated more than 400 TEUs through GTI, one of the container terminals at JNPA, within a six-hour window from midnight to the early morning hours. 7,541 TEUs were evacuated in the last 9 days for Polaris Logistics Park CFS. Their pendency from NSIGT Port is completed and today they will focus on the evacuation from NSICT and NSFT port.

In April 2026, JN Port recorded an average gate movement of 18,000 TEUs. The daily gate movement over the last 24 hours stood at 18,196 TEUs. The overall daily average gate movement for the current year stands at 17,684 TEUs.

The port in consultation with the stakeholders has taken various measures to mitigate the problem. The following are a few such measures which have been implemented on the ground, and which resulted in a reduction in the number of stranded containers.

- To ease out the situation, JN Port takes regular meetings with concerned stakeholders on a daily basis, and a monitoring cell is working throughout the day to assess the situation and take action then and there.

- JNPA facilitated additional movement of trains from Port to nearby CFS for shifting containers to CFS. Approx 3 to 4 trains in a day are operated in this manner.
- JN Port arranged a special train for bringing drivers from West Bengal, Uttar Pradesh, Madhya Pradesh etc. The train was run on the route Malda (West Bengal) – Uttar Pradesh (Eastern) - Madhya Pradesh – Panvel (Maharashtra).
- Advertisement was published on daily newspaper (Maharashtra State) and TV News channel (all India basis) inviting more drivers.
- A green channel gate facility was made for entry of CFS TTs at nearly 100 numbers, and faster evacuation of containers was ensured.
- This has facilitated more trips for the trailer operation. Earlier the trailers were able to do only 2 trips, now they are able to do 3 to 4 trips in a day. This has facilitated to stop the increase in yard pendency which was otherwise increasing too much.
- The trailers coming with export containers from far of places are facilitated to take import containers back in their return journey. Necessary co-ordination with concerned organisations is done by JNPA.
- Customs also have come up with several measures to help trade in this situation. The scanning process has been made easy to carry two containers together in one trailer. Quick permission was granted by Customs for changing the mode of transport from Road to rail to facilitate the CFS evacuation.
- Port also engaged with the Container Terminal operators to waived certain charges like, Change of Movement Mode charges, shifting charges confined to only one shifting even when there is multiple shifting necessitated and rationalisation of rail charges between road movement charges.
- As of today, there is considerable improvement in the daily container movement, about 18000 TEUs daily gate operation, and the situations may be normalized by the first week of June 2026.

The shortage is seasonal in nature, as drivers traditionally return to their native places during this period for agricultural activities, vacations, and social commitments. However, this year the situation has been further impacted due to elections in West

Bengal and Eastern Uttar Pradesh — regions from where a significant percentage of drivers are engaged — along with disruptions in food and highway support services.

JNPA, in coordination with the Ministry and all stakeholders, remains fully committed to ensuring efficient port operations, minimizing logistics disruptions, and safeguarding the interests of exporters, importers, transporters, and the wider trade community.

**About Jawaharlal Nehru Port Authority (JNPA):**

The Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) is one of the premier container-handling ports in India. Since its inception on May 26, 1989, JNPA has transformed from a bulk cargo terminal into the premier container port in the country.

Currently, JNPA operates five container terminals - NSFT, NSICT, NSIGT, BMCT and APMT. The Port also has a shallow water berth for general cargo operated by Nhava Sheva Distribution Terminal Pvt. Ltd. (NSDT). A Liquid Cargo Terminal present at the JNPA Port is managed by the BPCL-IOCL consortium and the additional liquid cargo terminal developed by JNPA is operated by M/s JSW - JNPT Liquid Terminal Pvt. Ltd. Additionally, the newly constructed coastal berth links other Indian ports and facilitates enhancing the traffic of coastal containers.

Nestled across 277 hectares of land, JNPA also operates a meticulously designed multi-product SEZ, with state-of-the-art infrastructure, to boost export-oriented industries in India. JNPA is also developing an all-weather, deep-draft, greenfield port at Vadhvan, the 13th Major Port of India in Maharashtra. It is poised to be among the top 10 ports globally and will be a 100% green port since its inception.

**For media enquiries, please contact:**

Ambika Singh
Sr. Manager (Marketing), JNPA
Mob: +91 9920372677
E-mail: ambikasingh@jnport.gov.in

**Visit our website and social media to learn more:**

JN Port: www.jnport.gov.in
LinkedIn: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority
X: @JNPort
Instagram: @jnpaport
Facebook: @JNPA

— Ends —

जनेप प्राधिकरण
JNPA
INDIA'S LARGEST CONTAINER PORT

# जेएनपीएकडून कंटेनर हालचालीबाबत अद्ययावत माहिती; सीएफएसकडे जाणाऱ्या कंटेनर्सच्या संख्येत घट

**मुंबई, 24 मे 2026**: भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) गुरुवारी माहिती दिली की, विविध उपाययोजना राबवल्यामुळे 15 दिवसांहून अधिक काळ अडकून पडलेल्या सीएफएसकडे जाणाऱ्या कंटेनर्सची संख्या सुमारे 2500 वरून 450 पर्यंत घटली आहे. पुढील आठवडाभरात ही संख्या नगण्य पातळीवर येण्याची अपेक्षा आहे. बंदराच्या लॉजिस्टिक व्यवस्थेमध्ये निर्माण झालेल्या तीव्र चालक टंचाईमुळे ही परिस्थिती उद्भवली होती.

आजच्याघडीला आयात कंटेनर्सच्या सरासरी दैनंदिन डिस्चार्जचे प्रमाण 12,237 टीईयू इतके असून, आयात – सीएफएस प्रलंबित कंटेनर्सची संख्या सध्या 40,809 टीईयू इतकी आहे. गेट मूव्हमेंटअंतर्गत एकूण 17,425 टीईयू हालचाल नोंदविण्यात आली असून, त्यामध्ये 7,950 टीईयू इनबाउंड तर 9475 टीईयू आऊटबाउंड हालचालींचा समावेश आहे. तसेच, एनएसआयसीटी आणि एनएसआयजीटी येथून अमेया सीएफएससाठी ग्रीन चॅनेल मूव्हमेंट सुरू करण्यात आली आहे. कंटेनर्सच्या वाहतुकीसाठी नासकोवा संस्थेकडून 70 ते 80 ट्रॅक्टर ट्रेलर तैनात केले आहेत.

केरी इंडेव्ह सीएफएसने जेएनपीएतील कंटेनर टर्मिनलपैकी एक असलेल्या जीटीआयमार्फत मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंतच्या सहा तासांच्या कालावधीत 400 हून अधिक टीईयू कंटेनर्सची यशस्वी वाहतूक पूर्ण केली आहे. तसेच, मागील 9 दिवसांत पोलारिस लॉजिस्टिक्स पार्क सीएफएससाठी 7541 टीईयू कंटेनर्सची वाहतूक करण्यात आली आहे. एनएसआयजीटी बंदरातील त्यांची प्रलंबित वाहतूक पूर्ण झाली असून, आज एनएसआयसीटी आणि एनएसएफटी बंदरांमधील कंटेनर्सच्या वाहतुकीवर भर दिला जाणार आहे.

एप्रिल 2026 मध्ये जेएन पोर्टमध्ये सरासरी गेट मूव्हमेंट 18,000 टीईयू इतकी नोंदविण्यात आली होती. मागील 24 तासांतील दैनंदिन गेट मूव्हमेंट 18196 टीईयू इतकी नोंदविण्यात आली. चालू वर्षातील एकूण दैनंदिन सरासरी गेट मूव्हमेंट 17684 टीईयू इतकी आहे.

बंदराने संबंधित घटकांशी सल्लामसलत करून ही समस्या कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. खाली त्यापैकी काही उपाययोजना दिल्या आहेत, ज्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात आली असून, त्यामुळे अडकलेल्या कंटेनर्सच्या संख्येत घट झाली आहे.

- परिस्थिती सुरळीत करण्यासाठी जेएन पोर्टकडून संबंधित भागधारकांसोबत दररोज नियमित बैठका घेतल्या जात आहेत. तसेच, परिस्थितीचा सतत आढावा घेऊन तत्काळ आवश्यक उपाययोजना करण्यासाठी दिवसभर कार्यरत असलेली एक मॉनिटरिंग सेल देखील कार्यरत आहे.
- कंटेनर्स सीएफएसकडे हलविण्यासाठी जेएनपीएकडून बंदरातून जवळील सीएफएसपर्यंत अतिरिक्त रेल्वे वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अंतर्गत दररोज सुमारे 3 ते 4 रेल्वेगाड्या चालविण्यात येत आहेत.
- तसेच, चालकांची कमतरता दूर करण्यासाठी जेएन पोर्टकडून पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आदी राज्यांमधून चालकांना आणण्यासाठी विशेष रेल्वेगाडीची व्यवस्था करण्यात आली. ही रेल्वे मालदा (पश्चिम बंगाल) – पूर्व उत्तर प्रदेश – मध्य प्रदेश – पनवेल (महाराष्ट्र) या मार्गावर चालविण्यात आली.
- अधिक चालक उपलब्ध व्हावेत यासाठी महाराष्ट्रातील दैनिक वृत्तपत्रे तसेच अखिल भारतीय स्तरावरील वृत्तवाहिन्यांमध्ये जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या.
- सीएफएस टीटींच्या जलद प्रवेशासाठी सुमारे 100 वाहनांसाठी ग्रीन चॅनेल गेट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, त्यामुळे कंटेनर्सच्या जलद वाहतुकीस मदत झाली आहे.
- या उपाययोजनांमुळे ट्रेलरच्या फेऱ्यांमध्ये वाढ झाली आहे. पूर्वी ट्रेलर्सना दिवसाला केवळ 2 फेऱ्या करता येत होत्या, तर आता ते दिवसाला 3 ते 4 फेऱ्या करू शकत आहेत. यामुळे यार्डमधील वाढत असलेली प्रलंबित कंटेनर्सची संख्या नियंत्रणात आणण्यास मोठी मदत झाली आहे.
- दूरवरच्या भागांतून निर्यात कंटेनर्स घेऊन येणाऱ्या ट्रेलर्सना परतीच्या प्रवासात आयात कंटेनर्स वाहून नेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी आवश्यक समन्वय संबंधित संस्थांसोबत जेएनपीएकडून करण्यात आला आहे.
- या परिस्थितीत व्यापाराला दिलासा देण्यासाठी सीमाशुल्क विभागानेही विविध उपाययोजना केल्या आहेत. एका ट्रेलरमध्ये दोन कंटेनर्स एकत्र स्कॅन करता यावेत यासाठी स्कॅनिंग प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. तसेच, सीएफएसमधील कंटेनर्सची जलद वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी रस्ते वाहतुकीऐवजी रेल्वे वाहतुकीकडे वळण्यास सीमाशुल्क विभागाकडून तातडीने परवानगी देण्यात आली.
- याशिवाय, बंदर प्रशासनाने कंटेनर टर्मिनल ऑपरेटर्ससोबत समन्वय साधून काही शुल्कांमध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये 'चेंज ऑफ मूव्हमेंट मोड' शुल्क माफ करणे, अनेक वेळा शिफ्टिंग आवश्यक असतानाही केवळ एकदाच शिफ्टिंग शुल्क आकारणे, तसेच रस्ते वाहतुकीच्या तुलनेत रेल्वे वाहतूक शुल्काचे सुसूत्रीकरण करणे यांचा समावेश आहे.
- आजच्या घडीला, दैनंदिन कंटेनर वाहतुकीत लक्षणीय सुधारणा झाली असून, दररोज सुमारे 18000 टीईयू गेट ऑपरेशन होत आहे आणि जून 2026 च्या पहिल्या आठवड्यापर्यंत परिस्थिती सामान्य होण्याची शक्यता आहे.

ही चालक टंचाई हंगामी स्वरूपाची असून, दरवर्षी याच कालावधीत चालक शेतीची कामे, सुट्ट्या तसेच सामाजिक कार्यक्रमांसाठी आपल्या मूळ गावी परत जातात. मात्र, यावर्षी पश्चिम बंगाल आणि पूर्व उत्तर प्रदेशातील निवडणुकांमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. या भागांतून मोठ्या प्रमाणावर चालक कार्यरत असतात. यासोबतच अन्नपुरवठा आणि महामार्गावरील सहाय्यक सेवांमध्ये निर्माण झालेल्या अडचणींचाही या परिस्थितीवर परिणाम झाला आहे.

जेएनपीए मंत्रालय आणि सर्व संबंधित भागधारकांच्या समन्वयाने कार्य करत असून, बंदरातील कार्यप्रणाली सुरळीत ठेवणे, लॉजिस्टिकमधील अडथळे कमी करणे तसेच निर्यातदार, आयातदार, वाहतूकदार आणि व्यापक व्यापारी समुदायाच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे.

**जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) विषयी माहिती:**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जनेप प्राधिकरण) हे भारतातील प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांपैकी एक आहे. 26 मे 1989 रोजी स्थापना झाल्यापासून, जनेप प्राधिकरण एक बल्क कार्गो टर्मिनलवरून देशातील प्रमुख कंटेनर बंदरात रूपांतरित झाले आहे.

सध्या, जनेप प्राधिकरण पाच कंटेनर टर्मिनल्स चालवते एन एस एफ टी, एन एस आय सी टी, एन एस आय जी टी, बी एम सी टी आणि ए पी एम टी. न्हावा शेवा डिस्ट्रिब्युशन टर्मिनल प्रा. लि. (एनएसडीटी) द्वारे संचालित सामान्य मालासाठी एक उथळ पाण्याचा बर्थ देखील आहे. जनेप प्राधिकरण पोर्टवर उपस्थित असलेले लिक्विड कार्गो टर्मिनल बीपीसीएल आयओसीएल कन्सोर्टियम द्वारे व्यवस्थापित केले जाते आणि जेएनपीएने विकसित केलेले अतिरिक्त लिक्विड कार्गो टर्मिनल मेसर्स जेएसडब्ल्यू - जेएनपीटी लिक्विड टर्मिनल प्रा. लि. द्वारे चालवले जाते. या व्यतिरिक्त, नव्याने बांधलेला किनारी धक्का इतर भारतीय बंदरांना जोडतो आणि किनारपट्टीवरील कंटेनरची वाहतूक वाढवते.

277 हेक्टर जमिनीवर वसलेले, जनेप प्राधिकरण भारतातील निर्यात-केंद्रित उद्योगांना चालना देण्यासाठी, अत्याधुनिक पायाभूत सुविधांसह, काळजी पूर्वक डिझाइन केलेले बहुउत्पादक विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) देखील चालवते.

जेएनपीए वाढवण येथे एक सर्व-हवामान, डीप ड्राफ्ट, ग्रीनफिल्ड बंदर विकसित करत आहे, जे महाराष्ट्रातील भारताचे १३वे मोठे बंदर असेल. हे जागतिक स्तरावरील सर्वोत्कृष्ठ १० बंदरांमध्ये स्थान मिळवणार आहे आणि स्थापनेपासून १००% हरित बंदर असेल.

**मीडिया चौकशीसाठी, कृपया संपर्क साधा:**

जनेप प्राधिकरण:

अंबिका सिंग

सीनियर मॅनेजर (मार्केटिंग), जनेप प्राधिकरण

मोबाईल क्रमांक: +919920372677

ईमेल: ambikasingh@jnport.gov.in

**अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाइट आणि सोशल मीडियाला भेट द्या:**

जेएन पोर्ट : www.jnport.gov.in

लिंक्डइन: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority

एक्स: @JNPort

इंस्टाग्राम: @jnpaport

फेसबुक: @JNPA